**आर.सी.सी क्र.६८/२०२४**
**निशाणी क्र.२४.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२**

माझे शपथेवर कथन की,

| | | |
|---|---|---|
| **नाव** | – | योगेश सच्चीतानंद चांडक, |
| **वय** | – | ३९ वर्षे, **धंदा** – खाजगी नोकरी, |
| **रा.** | – | मुक्काम कारेगाव, ता. शिरुर, जि. पुणे. |

**सरतपास**

**अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस. दराडे यांचेकडून –**

०१. मी आरोपीस ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. फिर्यादी ही माझी पत्नी आहे. घटना अडीच ते तीन वर्षांपूर्वी घडली. माझे मूळ गांव चापडगाव हे आहे. चापडगाव येथे आमचे प्लास्टीक कटलरीचे दुकान होते. माझी आरोपीकडे उधारी असल्याचे कारणावरुन माझे व आरोपीचे वाद झाले होते. माझ्या पत्नीने आरोपी विरुध फिर्याद दिली होती. घटना काय घडली हे मला आठवत नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतल्या बाबत मला आठवत नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासणीची परवाणगी मागीतली, परवाणी देण्यात आली.)**

०२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या पत्नीचा पाठलाग करुन तिला SMS पाठविल्या बाबत मी आरोपीला जाब विचारला असता त्याने मला शिवीगाळ, मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी दिनांक २८/११/२०२३ रोजी माझा जबाब नोंदविला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग–अ आणि भाग– ब मला वाचून दाखविला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर जबाबा मधील अधोरेखांकित भाग–अ आणि भाग–ब हा माझ्या सांगण्यावरुन लिहुन घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, आमची व आरोपीची आपसात तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपीस वाचविण्यासाठी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास**

**आरोपींचे विधिज्ञ श्री. ए. बी. शेख यांनी नाकारला.**

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,

VAISHALI SANJAY MORE
Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.02.11 12:36:26 +0530

दिनांकः– ११/०२/२०२५

(वैशाली सं. मोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव.